# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ३१५ दिनांक :- १२/११/२०२१

## वेश्याव्यवसाय करण्याऱ्या महिला वेश्या दलाल हिस ताब्यात घेवुन ०१ पिडीत मुलीची सुटका - अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी

दिनांक १०/११/२०२१ रोजी अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, भाईंदर यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, मिरारोड परिसरात राहणारी महिला नामे सपना व तीचा साथीदार विनोद यांना गिऱ्हाईकांनी संपर्क साधला की, ते व्हॉटसअप ॲपद्वारे गिऱ्हाईकांना मुलींचे फोटो पाठवून सदर मुलींस वेश्यागमनासाठी मिरा-भाईंदर परिसरातील लॉजमध्ये गिऱ्हाईकांस रुम बुक करावयास लावून त्यांच्याकडुन वेश्यागमनाचा मोबदला घेवुन मुली पुरवितात.

मिळालेल्या गुप्त बातमीच्या अनुषंगाने श्री. एस. एस. पाटील, वरिष्ठ पोलीस निरीक्षक अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंधक कक्ष, भाईंदर यांनी बोगस गिऱ्हाईक व पंच यांना जय महल लॉजचे परिसरात, न्यु गोल्डन नेस्ट, भाईंदर पुर्व या ठिकाणी पाठवून सत्यता पडताळुन पोलीस पथकासह दु. १३:०५ वाजेच्या सुमारास छापा कारवाई केली असता महिला वेश्या दलाल सपना मुखर्जी ही वेश्यागमनाच्या मोबदल्यात पैसे स्विकारुन पुरुष ग्राहकांना मुली पुरवित असतांना मिळुन आल्याने वेश्यागमनाकरीता स्वीकारलेल्या रक्कमेसह ताब्यात घेवुन ०१ पीडित मुलीची सुटका करण्यात आली. आरोपी सपना मुखर्जी, व तिचा साथीदार पाहिजे आरोपी विनोद यांच्या विरुध्द नवघर पोलीस ठाणे येथे गुन्हा रजि. नं. I ७६९/२०२१ भा. द. वि. सं. कलम ३७०, ३४ सह अनैतिक व्यापार प्रतिबंधकायदा १९५६ चे कलम ४,५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई श्री. महेश पाटील, पोलीस उप. आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संपतराव पाटील, पो. हवा. उमेश पाटील, रामचंद्र पाटील, पो.ना. गावडे, वैष्णवी यंबर, पो.शि. केशव शिंदे, सुप्रिया तिवले यांनी कामगिरी केली आहे.

-------0000-------